**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**
**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४८/२०२०** **दिनांक १६/०६/२०२०** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १०/०६/२०२० ते १६/०६/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १७/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून २१/०६/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०/०६ | ११/०६ | १२/०६ | १३/०६ | १४/०६ | १५/०६ | १६/०६ | | १७/०६ | १८/०६ | १९/०६ | २०/०६ | २१/०६ |
| - | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | १२३ | १०० | १५९ | ६० | ७९ |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३१ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २५ | २६ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ८ | ८ | ७ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९७ | ९६ | ९७ | ९५ | ९४ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ९३ | ९३ | ९४ | ९२ | ८७ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ८ | ११ | १२ | ९ | ११ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै.द. | द. | द. | द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| -- | -- | **५१९७.२** |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १७ ते २१ जून, २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता असून दिनांक १७ ते १९ जून २०२० दरम्यान तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **रोप अवस्था** | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भात रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता रोपवाटिकेला देण्यात येणारी युरिया खताची मात्रा पुढे ढकलावी.<br>• भात क्षेत्रातील बांधांची बांधबंधीस्ती करावी तसेच बांध तणमुक्त ठेवावेत.<br>• बांधावरील खेकड्यांच्या नियंत्रणासाठी पावसाळ्याच्या सुरुवातीला सलग २ ते ३ रात्री बांधावरील खेकडे बत्तीच्या उजेडात पकडून त्यांची संख्या कमी करावी आणि नंतर विषारी आमिषाचा वापर करून खेकड्यांचे नियंत्रण करावे. १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत आमिष वापरावे. विषारी आमिषाचा वापर सांघिकरीत्या व एकाच वेळी केल्यास खेकड्यांचे नियंत्रण करण्यास मदत होईल. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही.) |
| **नागली** | **रोपवाटिका** | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता पेरणी केलेल्या नागली पिकाच्या रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• नागली पिकाच्या रोपवाटिकेची पेरणी करावयाची राहिली असल्यास पेरणीची कामे पूर्ण करून घ्यावीत. |
| **आंबा** | **-** | • दिनांक १७ ते १९ जून २०२० दरम्यान मुसळधार पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने आंब्याला देण्यात येणारी खताची मात्रा पुढे ढकलावी. आणि दिनांक १९ जुने, २०२० नंतर पाऊसाची तीव्रता कमी असताना आंब्याच्या झाडांना खते द्यावीत. दहा वर्षावरील आंबा कलमास ५० ते १०० कि.ग्रॅ. चांगले कुजलेले शेणखत, ३ किलो २५० ग्रॅम युरिया, ३ किलो १२५ ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट व २ किलो सल्फेट ऑफ पोटॅश खते प्रती कलमास देण्यात यावी. खते कलमाच्या विस्ताराच्या आत सुमारे ४५ ते ६० सें.मी. रुंद आणि १५ सें.मी. खोल वर्तुळाकार चर खणून द्यावीत. चरामध्ये प्रथम पालापाचोळा, शेणखत टाकून त्यावर रासायनिक खते टाकून मातीने चर बुजवून घ्यावेत. |
| **नारळ** | **-** | • दिनांक १७ ते १९ जून २०२० दरम्यान मुसळधार पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने नारळाला देण्यात येणारी खताची मात्रा पुढे ढकलावी. आणि दिनांक १९ जुने, २०२० नंतर पाऊसाची तीव्रता कमी असताना नारळाला खते द्यावीत. नारळाच्या पाच वर्षावरील प्रती माडास ३० कि.ग्रॅ. शेणखत, ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट, ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश खताची मात्रा पावसाची तीव्रता कमी असताना बांगडी पध्दतीने देण्यात यावी. वर दिलेली खताची मात्रा पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/५ पट, दुसऱ्या वर्षी २/५ पट, तिसऱ्या वर्षी ३/५ पट आणि चौथ्या वर्षी ४/५ पट द्यावीत.<br>• मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नारळ बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **सुपारी** | **-** | • मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता सुपारी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **नवीन फळबाग** | **लागवड** | • मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नवीन फळबागेची लागवड पुढे ढकलावी. |

| | | |
|---|---|---|
| **भाजीपाला** | **रोपवाटिका** | • पुढील पाचही दिवस जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भाजीपाला रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **पशुधन व्यवस्थापन** | **-** | • जनावरांना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच येणाऱ्या पाऊसापासून योग्य ते संरक्षण करावे.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी पॅरा गवत, संकरीत नेपियर (जयवंत को- ३, यशवंत) या बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• जनावरांना आंत्रविषार रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना लसीकरण करून घ्यावे. |
| **टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.** | | |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |